बी. डी. काळे. महाविद्यालय, घोडेगाव

# आर्थिक विकास आणि नियोजन

## TYBA (G-3)

प्रा. डॉ. सौ. छाया दिनेश जाधव

# २- विकसनशील देश

# विकसित देश

ज्या देशांचे दरडोई उत्पन्न सर्वोच्च आहे, राहणीमानाचा निर्देशांक उच्च आहे, साक्षरतेचा उच्चांक गाठलेला आहे आणि सरासरी आयुर्मान अधिक आहे, अशा देशांना 'विकसित देश' म्हणतात.

**उदा. अमेरिका, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स व जपान**

"ज्या देशांचे दरडोई स्थूल उत्पन्न हे 11,455 डॉलर्सपेक्षा अधिक आहे अशा उच्च उत्पन्न गटातील देश म्हणजे विकसित देश होय."
अमेरिका, जर्मनी, स्वीडन, फ्रान्स, बेल्जिअम, संयुक्त राज्ये, नार्वे, डेन्मार्क, जपान आणि स्वीत्झर्लंड इ. देशांचा समावेश विकसित देशांत होतो.

# विकसनशील देश

ज्या देशाचे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न 936 डॉलर्स ते 11,455 डॉलर्सच्या दरम्यान आहे, अशा अल्प व मध्यम उत्पन्न गटातील देश म्हणजे विकसनशील देश होय.

उदा. भारत व चीन

“देशातील वर्तमान लोकसंख्येला उच्च पातळीचे राहणीमान प्राप्त करून देण्यासाठी जेथे अधिक श्रम, नैसर्गिक साधने व भांडवल हे घटक वापरण्याची भविष्यकालीन क्षमता आहे, असे देश म्हणजे विकसनशील देश होय”

# अल्पविकसित देश

ज्या देशांमध्ये आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू झाली आहे, परंतु त्यांनी साध्य केलेली विकासाची पातळी खूपच अल्प आहे अशा देशांना **अल्पविकसित देश** म्हणतात,

उदा. श्रीलंका, पाकिस्तान

"ज्या देशांचे दरडोई वास्तव उत्पन्न अमेरिका, कॅनडा व पश्चिम युरोपिय देशांच्या दरडोई वास्तव उत्पन्नाच्या एक- चतुर्थांशपेक्षा कमी असेल ते देश अल्पविकसित देश होय."- संयुक्त राष्ट्रसंघ

"ज्या देशात एकाचवेळी उपयोगात न आणलेली नैसर्गिक साधनसंपत्ति आणि अपूर्ण वापर केलेली मानवी श्रमशक्ति आढळते तो देश अल्पविकसित देश होय."- भारतीय नियोजन मंडळ

# विकसनशील देशाची वैशिष्टे

१ • आर्थिक वैशिष्टे

२ • लोकसंख्याविषयक  वैशिष्टे

३ • सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टे

४ • तंत्रज्ञान विषयक वैशिष्टे

५ • इतर वैशिष्टे

# आर्थिक वैशिष्टे

| | | | |
|---|---|---|---|
| दरडोई उत्पन्न कमी | आर्थिक मागासलेपणा | भांडवलनिर्मिती चा अल्प दर | प्राथमिक उत्पादनावर भर |
| आर्थिक विषमता | अविकसित संसाधने | औद्योगिकीकरणाची उणीव | मोठ्या प्रमाणावरील बेकारी |
| दारिद्र्याचे दुष्टचक्र | बँकिंग आणि व्यापारविषयक सुविधांची कमतरता | अल्प निर्यात | |

# लोकसंख्याविषयक वैशिष्टे

- अतिरिक्त लोकसंख्या
- शेती क्षेत्रावर लोकसंख्येचा अधिक दाब
- वाढता जन्म व घटता मृत्युदर
- कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण कमी
- ग्रामीण लोकसंख्या
- लोकसंख्येची गुणवत्ता कमी
- सरासरी आयुर्मान कमी
- कुशल श्रमाचा अभाव आणि कमी उत्पादकता
- संयोजक वर्गाचा अभाव

# सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टे

- निरक्षरता
- रूढी, परंपरा आणि चालीरिती
- स्त्रियांचा सामाजिक दर्जा कमी
- अंधश्रद्धेचा पगडा
- सामाजिक विविध वर्गात विभागणी
- हक्क आणि अधिकाराबद्दल कमी ज्ञान
- मध्यम वर्ग कमी

# तंत्रज्ञानविषयक वैशिष्टे

जुनाट व कालबाह्य उत्पादन तंत्र

तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण सुविधांचा अभाव

वाहतूक व दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा

# इतर वैशिष्टे

पर्यावरणाच्या दुष्परिणामांकडे दुर्लक्ष

अस्वच्छ वातावरण

रोगराईचे प्रमाण अधिक